सोमवार
१०.२.२०२५
वर्षे : ४ अंक : ३०४
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक
● छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर ●

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

marathwadapatra.com dailymarathwadapatra2021@gmail.com RNI : Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post : Reg.No. L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob : 9822152955 




# खा.बप्पा, कशाला मारता चांगुलपणाच्या गप्पा!

## ■ येडेश्वरी कारखान्याच्या अधिकाऱ्यांनी मुकादमास डांबले
## ■ बापाच्या सुटकेसाठी मुकादमाच्या मुलीची पोलिसात धाव

बीड । प्रतिनिधी

**गेल्या दोन दिवसांपासून माझ्या वडिलांचा फोन लागत नाही. त्यांना खा. बजरंग सोनवणे यांच्या येडेश्वरी शुगर कारखान्याचे गटप्रमुख व त्यांचे शेतकी अधिकारी असलेले महेंद्र पाटील व त्यांच्या साथीदारांनी माझ्या वडिलांचे बीडच्या महालक्ष्मी चौकातून अपहरण केल्याची खळबळजनक तक्रार सुर्याचीवाडी येथील शीतल चव्हाण या मुलीने बीड ग्रामीण पोलिसात केल्याने एकच खळबळ उडाली आहे. तिने तक्रारीत स्पष्टपणे म्हटले धाव, म्हणाली, आहे, येडेश्वरी शुगरच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनीच माझ्या वडिलांचा बळजबरीने अपहरण केले आहे. त्यांचा घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती त्या मुलीने व्यक्त केली आहे.**

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे हत्या प्रकरण गाजत असतानाच आज पुन्हा एक अपहरणाचं प्रकरण समोर आलं आहे. बीड तालुक्यातील सुर्याचीवाडी येथील सदाशिव चव्हाण हे ऊसतोड मुकादम आहेत. मात्र सात फेब्रुवारीपासून ते बेपत्ता आहेत. चव्हाण कुटुंबीय त्यांना सातत्याने भ्रमणध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहे, मात्र त्यांचा फोन लागत नसल्याचे सांगत बेपत्ता सदाशिव चव्हाण यांच्या मुलीने आज थेट बीड ग्रामीण पोलीस ठाणे गाठत आपल्या वडिलाचे अपहरण झाल्याची तक्रार पोलिसात दिली आहे. तक्रारीत तिने स्पष्टपणे म्हटले आहे, येडेश्वरी शुगर कारखान्याचे गटप्रमुख व त्यांचे महेंद्र पाटील हे शेतकी अधिकारी व अन्य काही अज्ञात साथीदार माझ्या वडिलांच्या अपहरणामागे आहेत. त्यांनीच बळजबरीने माझ्या वडिलांचं अपहरण केलं आहे. त्याचबरोबर वडिलांचा घातपात होण्याची शक्यताही नाकारता येत नसल्याचे त्या मुलीने सांगत माझ्या वडिलांना आणि माझ्या कुटुंबियांना त्रास देणाऱ्या लोकांवर कठोर कारवाई करावी, असे सांगत शीतल चव्हाण या मुलीने येडेश्वरी कारखान्यातील अधिकाऱ्यांचे तीन नावे दिले आहेत. यामध्ये महेंद्र पाटील, ठोंबरे, शेळके यांचा उल्लेख आहे. सदरचा कारखाना हा खा. बजरंग सोनवणे यांचा आहे. या तक्रारीनंतर जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

### खासदाराच्या पीएचा तक्रारदाराला फोन

खा.बजरंग सोनवणे यांच्या पीएचा तक्रारदाराला फोन आला, सदरचं प्रकरण बाहेरच्या बाहेर मिटवू, तुमच्या माणसांनाही घेऊन येतो, असं संबंधित तक्रारदाराला म्हटल्याचे सांगण्यात येते. तेव्हा या प्रकरणाची तक्रार दाखल होणार की नाही? याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.



# सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीला आ.संदीप क्षीरसागर आले धावून!



## हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढ द्यावी

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ऐनवेळी आ.संदीप क्षीरसागर धावून आले आहेत. मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी सोयाबीनच्या खरेदीसाठी नाफेडकडे नावनोंदणी केली, मात्र मुदत संपल्यानंतर आता ही खरेदी कधी होणार? असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत असून शासनाने तातडीने शेतकऱ्यांच्या हिताचा विचार करत हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी तत्काळ मुदतवाढी द्यावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पणण मंत्री जयकुमार रावल व राज्याचे मुख्य सचिव यांच्याकडे केली आहे. याबाबत लेखी पत्रही आ.क्षीरसागर यांनी दिले आहे. सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांशी चर्चा केल्यानंतर अन् त्यांच्या संवादातून लक्षात आलेल्या समस्या लक्षात घेवून आ.संदीप क्षीरसागर यांनी शेतकऱ्यांच्या भावना पत्र लिहून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यापयंत पोहचवल्या आहेत. हंगाम ▶▶पान २ वर

# जरांगेंचा मेहुणा विलास खेडकरसह ९ जणांवर तडीपारीची कारवाई

जालना । प्रतिनिधी

जालन्यात वाळू माफिया आणि अट्टल गुन्हेगारांच्या विरोधात प्रशासन क्शन मोडवर आले असून, वाळू प्रकरणासह इतर गुन्ह्यातील नऊ आरोपींना जालनासह बीड, परभणी आणि छत्रपती संभाजी नगर या जिल्ह्यातून तडीपार करण्यात आलं आहे. मराठा आरक्षण (चरीींहर ठशीर्शीींळेप) आंदोलक मनोज जरांगे पाटील (चरपेक्ष गरीरपसश झरींळश्र) यांचा मेहुणा विलास खेडकर (तळश्ररी घहशवज्ञरी) याच्यावर देखील तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. मनोज जरांगे यांच्या मेहुण्यासह ९ वाळू माफिया आणि अटल गुन्हेगारांवर तडीपारीची कारवाई करण्यात आली आहे. अंबड उपविभागीय न्याय दंडाधिकारी यांच्या आदेशाने तडीपारीची कारवाई केली आहे. या आरोपींविरोधात जालन्यातल्या अंबड, घनसावंगी आणि गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल आहेत, अशी माहितीही समोर आली आहे. मनोज जरांगे यांच्या आंदोलनामध्ये सक्रिय असणाऱ्या जवळपास सहा आरोपींवरती परभणी, जालना बीड आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यातून हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे.सदर आरोपींवरती वाळू चोरी, जीवे मारण्याचा प्रयत्न, अंतरवाली सराटीच्या ▶▶पान २ वर

### जालन्यात प्रशासन ॲक्शन मोडवर

# व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी जालिंदर धांडे



बीड । प्रतिनिधी

व्हॉईस ऑफ मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्षपदी दै. प्रारंभचे संपादक जालिंदर धांडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. रविवारी दुपारी या संदर्भात बीड येथे एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीस व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांची ऑनलाईन उपस्थिती होती. व्हॉईस ऑफ मीडिया ही संघटना पत्रकारांच्या प्रश्नावर गेल्या पाच वर्षांपासून देशभरात काम करते. मागील तीन वर्षांपासून बीड जिल्हाध्यक्ष म्हणून बालाजी मारगुडे यांनी काम पाहिले. नविन होतकरू पत्रकारांना जिल्हाध्यक्ष पदावर संधी मिळावी. पत्रकारांमध्ये सतत नविन नेतृत्व तयार व्हावे यासाठी मारगुडे यांनी जालिंदर धांडे यांचे नाव जिल्हाध्यक्षपदासाठी सुचविले होते. त्यास पत्रकार सोमनाथ खताळ, आनंद डोंगरे यांनी अनुमोदन दिले. ▶▶पान २ वर

# शिवजन्मोत्सव सोहळ्यात यावर्षी शिवशाही महानाट्याचे आयोजन-आ.विजयसिंह पंडित



गेवराई । प्रतिनिधी

आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून यावर्षी शिवजन्मोत्सव सोहळ्यात सुप्रसिद्ध ऐतिहासिक महानाट्याचे लेखक महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी पत्रकार परिषदेत दिली. शिवजन्म शिवजन्मोत्सव सोहळ्याची माहिती देताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की २०१४ पासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन केले जाते. वर्गणी आणि डीजे मुक्त वातावरणात हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. यापूर्वी शिवगर्जना, शिवपुत्र संभाजी, राजा शिवछत्रपती या महानाट्याचे आयोजन करण्यात आले व त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य ▶▶पान २ वर

### नाट्यमंच, मंडप उभारणीचा शुभारंभ

राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित ऐतिहासिक महानाट्य शिवशाही साठी नाट्यमंच आणि मंडप उभारणी कामांचा भव्य शुभारंभ आज शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजक आ. विजयसिंह पंडित यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी भवानी बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या हस्ते विधिवत पूजा करण्यात आली. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे संचालक श्रीराम आरगडे, आप्पासाहेब गव्हाणे, सुभाषराव मस्के, जालिंदर पिसाळ, नगरसेवक शाम येवले, शारदा स्पोर्ट्स कडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, ▶▶पान २ वर

# ...तर आपला एक वेगळा पक्षच उभा राहील



नाशिक । वृत्तसेवा

गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील इतकी मोठी ताकद मुंडे साहेबांच्या प्रेम करणाऱ्या लोकांमध्ये आहे, असे विधान भाजप नेत्या, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी केले. श्री स्वामी समर्थ कृषी विकास आणि संशोधन चॅरिटेबल ट्रस्ट, दिंडोरी आणि महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक कृषी महोत्सवाचे उद्घाटन पंकजा मुंडे यांच्या हस्ते नाशिकमध्ये झाले.

### पंकजा मुंडे यांचे मोठे विधान

यावेळी आयोजित कार्यक्रमात पंकजा मुंडे यांनी शेतकरी बांधवांना संबोधित केले. या कार्यक्रमाला धुळ्याच्या खासदार शोभाताई बच्छाव, भाजप आमदार सीमा महेश हिरे, आण्णासाहेब मोरे, लक्ष्मण सावजी आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी पर्यावरण, नद्या पुनर्जीविताचा विषय ते महाराष्ट्रात भाजप रुजण्यात गोपीनाथ मुंडे यांचे योगदान अशा विषयांवर पंकजा मुंडे यांनी भाष्य केले. गोपीनाथ मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांची संख्या खूप मोठी आहे. त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या लोकांचा जर आपण एक साठा केला तर एक वेगळा पक्षच उभा राहील. पर्यायाने माझ्याबरोबर जोडले गेलेले केवळ मुंडे साहेबांची मुलगी म्हणून मला जोडले जाऊ शकले नसते, ▶▶पान २ वर

# रब्बी हंगामात गहू-हरभऱ्याला नवा पर्याय; चिया पिकामुळं शेतकरी होऊ शकतो मालामाल

## गेवराई तालुक्यातील रानमळा शिवारात 'चिया' पिक बहरले

गेवराई । प्रतिनिधी

शेतकरी आता शेतात पारंपारिक पिकं न घेता आधुनिक शेतीकडे वळत आहेत. गहू आणि हरभऱ्याच्या पिकाला पर्याय म्हणून शेतकऱ्यांनी आता वेगळा पर्याय निवडला आहे. तो म्हणजे चिया या पिकाला बाजारात चांगला भाव देखील मिळत आहे. गेवराई तालुक्यातील रानमळा शिवारात ज्ञानेश्वर रोकडूबा ढाकणे यांनी दीड एक्कर क्षेत्रात चिया पिकाची लागवड केली असून चिया हे पिक सध्या चांगलेच बहरले आहे. गेवराई तालुक्यातील रानमळा येथे शेतकरी ज्ञानेश्वर रोकडुबा ढाकणे यांनी दीड एक्कर क्षेत्रामध्ये चिया पिकाची लागवड केलेली आहे. तर वन्य जंगली प्राण्यापासून पूर्णतः संरक्षण असल्यामुळे या पिकाची पेरणी करण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. हे पिक तीन महिन्यांत काढणीस येते. तर चिया हे पीक मुख्यतः अमेरिकेमध्ये घेतले जात आहे. या पिकाला खत, औषध, फवारणी लागत नाही. त्यांच्या उग्र वासाने वन्यप्राणी डुक्कर, हरिण हे या पिकाला खात नाहीत. व नुकसान पण करत नाहीत. तसेच बी.पी व शुगरच्या रुग्णांना रोग प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी चियाचा वापर केला जातो. शेतकरी सध्या औषधी गुणधर्म असलेल्या चिया पिकाकडे वळाले आहेत. यंदाच्या रब्बी हंगामात अनेक शेतकऱ्यांनी चियाची लागवड केली आहे. इतर पिकांच्या तुलनेत या पिकाचा उत्पादन खर्च कमी असून उत्पन्न चांगले ▶▶पान २ वर





# ‘डंकी’ डंख!

अमेरिकेतून हाता-पायाला बेड्या घालून, लष्करी विमानात अवमानास्पदरीत्या ढकलून, चार ठिकाणी थांबत ४० तासांच्या डांबलेल्या प्रवासानंतर १०४ थकलेले आणि हरलेले भारतीय जीव दिल्लीत कसे उतरतील, याची चिंता वाटल्यामुळेच बहुधा त्यांना अमृतसरमध्ये उतरवण्याचा निर्णय केंद्र सरकारकडून झाला असावा. बेकायदा स्थलांतरितांची पाठवणी करताना बेड्या ठोकणे हा अमेरिकेच्या स्थलांतरित विभागाच्या नित्य कार्यवाही प्रक्रियेचा भाग असतो वगैरे स्पष्टीकरणवजा समर्थन परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी दिलेलेच आहे. अजूनही अशी काही विमाने येत आहेत. हा मुद्दा अमेरिकेकडे उपस्थित करू, असे आश्वासन भारताच्या परराष्ट्र सचिवांनीही दिले आहे. त्यामुळेच, स्थलांतरितांना मिळालेल्या अवमानास्पद वागणुकीचा अर्थ सर्वसामान्य जनता, अनेक माध्यमे आणि सरकार व समर्थक अशांनी भिन्न प्रकारे लावला असे दिसते. कारण यावरून प्रकटणारी सार्वत्रिक चीड सरकारी पातळीवर झिरपलेली दिसत नाही. भारत हा लोकशाही देश. अमेरिकेचा मित्र देश. चीन, रशिया यांच्या पुंडाईविरोधात आश्वासक भूमिका बजावू शकेल असा देश. जागतिक दहशतवादाविरोधात अमेरिकेच्या नेहमीच खांद्याला खांदा लावून उभा राहिलेला देश. अशा देशाच्या नागरिकांना, भले ते बेकायदा असोत, पण दहशतवादी, तस्करांप्रमाणे उच्च सुरक्षेअंतर्गत बेड्या ठोकून पाठवले कसे जाऊ शकते? असाच प्रकार डोनाल्ड ट्रम्प यांच्या ‘नया अमेरिके’ने मेक्सिको, कोलंबिया या देशांच्या बेकायदा स्थलांतरितांबाबतही करायचा ठरवला, तेव्हा या दोन्ही देशांनी अत्युच्च पातळीवरून सरकारला जाब विचारला होता. आपण तो विचारू शकत नाही, विचारू इच्छित नाही. जवळपास १८ हजार भारतीयांना अशाच पद्धतीने पाठवले जाऊ शकते. पंतप्रधान नरेंद्र मोदी या महिन्याच्या १२ तारखेस अमेरिकेत त्यांचे मित्र डोनाल्ड ट्रम्प यांच्या भेटीसाठी जात आहेत. त्याच वेळी अशाच एखाद्या विमानाने अमेरिकेतून बेकायदा भारतीयांना घेऊन उड्डाण केले असेल किंवा पंतप्रधान जायच्या आधी असे एखादे विमान भारतात आलेही असेल. त्यांनाही असेच बेड्या घालून आणले, तर हा मुद्दा मोदी ट्रम्प यांच्या समक्ष उपस्थित करतील? अमेरिकेतून आणल्या गेलेल्यांच्या पहिल्या तुकडीत तरी गुजरात आणि पंजाबमधील नागरिकांची संख्या अधिक दिसते. हे जरा बुचकळ्यात टाकणारेच. कारण यांतील पहिले राज्य सधन उद्योगप्रधान आणि दुसरे सधन कृषिप्रधान. म्हणजे येथे बेरोजगारीचे प्रमाण देशाच्या सरासरीच्या तुलनेत तरी कमी असणे अपेक्षित. रोजगाराच्या संधी मिळण्याची शक्यता इतर अनेक राज्यांपेक्षा अधिक असणे अपेक्षित. गायपट्ट्यातली हिंदी भाषक राज्ये, ओडिशा-झारखंडसारखी आदिवासीबहुल राज्ये येथून खरे तर रोजगारार्थी देशभर फिरत असतात. पण अमेरिका, कॅनडा, युरोप येथे जमेल त्या अवैध मार्गांनी आणि अनाम, अनैतिक हस्तकांच्या माध्यमातून जाणाऱ्यांमध्ये गुजरात आणि पंजाबातील मंडळींचे प्रमाण अधिक असते. उद्यामशीलतेविषयी आणि शारीरिक क्षमतेविषयी अधिकारवाणीने बोलणाऱ्या या राज्यांतील मंडळींनी याविषयीदेखील बोलावे. ‘व्हायब्रंट गुजरात’च्या माध्यमातून गुंतवणुकीचे इव्हेंटी, झगमगते प्रदर्शन मांडणाऱ्यांनीही या मुद्द्यावर प्रामाणिक, परखड मतप्रदर्शन केल्याचे आढळत नाही. पंजाबमधील शेती आणि शेतीआधारित रोजगार यांचा ओसरता काळ सुरू झाल्याचा इशारा विश्लेषक गेली अनेक वर्षे देत आहेत. परवा विमानातून परतलेल्यांपैकी काहींनी एजंटांना एक-एक कोटी रुपये मोजून अमेरिकेची वाट धरली होती. काही जण दुबई ते ब्राझील ते कोलंबिया ते ग्वाटेमाला-मेक्सिको अशा मार्गांनी अमेरिकेत कित्येक दिवसांनी पोहोचले. गुजरातमधील एक चौकोनी कुटुंब जानेवारी २०२२ मध्ये कॅनडातून अमेरिकेत अवैध प्रकारे शिरण्याच्या प्रयत्नात असताना थंडीने गोठून मरण पावले. त्यानंतर स्थानिक पोलीस आणि सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडी यांनी तपास केला त्यावेळी धक्कादायक माहिती उघडकीस आली. कित्येक जण कॅनडात उच्चशिक्षण घेण्याच्या नावाखाली जातात आणि कॅनडातून अमेरिकेत घुसण्याचा मार्ग पत्करतात. हे सारे एजंटांमार्फत घडते. महाविद्यालयीन शिक्षणाच्या निमित्ताने व्हिसा मिळतो. कॅनडात गेल्यानंतर प्रवेश कोणते तरी कारण देऊन रद्द



केला जातो. तेथे येणाऱ्या असंख्य विद्यार्थ्यांपैकी कोणी प्रवेश घेतला, न घेतलेले जातात कोठे, त्यांचा माग काढून त्यांना मायदेशी पाठवावे इतकी कॅनडातील यंत्रणा तत्पर आणि सक्षम नाही. हे जाणूनच कॅनडातून अमेरिकेत शिरण्याचा मार्ग पत्करला जातो. याचाच अर्थ भारतीय मेक्सिको सीमेवरूनही अमेरिकेत शिरण्याचा प्रयत्न करतात नि कॅनडा सीमेवरूनही शिरण्याचा प्रयत्न करतात. यांतले दक्षिणेकडून म्हणजे मेक्सिको सीमेवरून जाणारे बऱ्याचदा दक्षिण आणि मध्य अमेरिकेतील अनेक देशांचा प्रवास पायी करून आलेले असतात. या देशांमध्ये त्यांना पुरेसे अन्न, इतर सुविधा, औषधोपचार वगैरे पुरवण्याची जबाबदारी ना संबंधित एजंटांची असते, ना त्या-त्या सरकारची. या प्रत्येक मार्गावर बहुधा उगम देश सोडला तर या मंडळींची वाटचाल छुप्या मार्गांनी आणि अटक व मृत्यू टाळतच होत असते. कारण त्यांना कोणतेही कायदेशीर अस्तित्व नसते. बऱ्याचदा ग्वाटेमाला, एल साल्वाडोरसारख्या देशांचे पोलीसही प्रचंड भ्रष्ट असल्यामुळे त्यांच्या देशात आलेली ‘ब्याद’ लवकरात लवकर शेजारील देशात कशी पाठवली जाईल याविषयीच ते दक्ष आणि तत्पर असतात. जंगलझुडुपांतून, वन्य श्वापदे आणि लुटारू टोळ्यांना चुकवत, नद्या आणि पर्वतांचे अडथळे ओलांडत ‘अमेरिकन ड्रीम’च्या दिशेने होणारा हा जीवघेणा आणि प्रतिष्ठा मातीमोल करणारा प्रवास थेट मध्ययुगाची आठवण करून देणाराच. तो करताना यांची बुद्धी शाबूत असेलच ना. आपल्याकडून एक कोटी रुपये घेऊन कधी चेहराही न दाखवणारा, कॅनडात न झेपणाऱ्या उच्च शिक्षणासाठी ४० ते ५० लाख उकळणारा एजंट हाच आपण आणि अमेरिकेदरम्यानचा दुवा असल्याचे या साऱ्यांना पक्के ठाऊक होते. अमेरिकेत जाऊन आपण बेकायदा निवासीच बनणार आणि कधीही तेथून आपली भारतात पाठवणी होऊ शकते याचीही कल्पना बहुतांना असणारच. तरीदेखील इतकी मोठी जोखीम पत्करावी वाटते, याचा अर्थ त्यांना मायभूमीकडून किती अपेक्षा उरल्या आहेत, याचा अंदाज बांधता येतो. कोणत्याही सरकारने किंवा सरकारपुरस्कृत अर्थविश्लेषकाने याचा खोलात जाऊन विचार करण्याची तयारी आणि इच्छाशक्ती दर्शवलेली दिसत नाही. गुजरात आणि पंजाबसारख्या राज्यांतून ही ‘गळती’ सुरू राहते. याच्या मुळाशी आहे रोजगारनिर्मितीचे भीषण वास्तव नि त्यातून उद्भवणारी असीम अगतिकता. अमेरिकेतील स्वप्नाच्या मागे धावावे लागते, कारण एक स्वप्न येथील भूमीत केव्हाच विरलेले असते. अल्पकौशल्य किंवा मध्यम कौशल्याचे रोजगार, फुटकळ कामे, छोटा व्यापार, असलीच हाताशी पदवी तर तिची नोकरीत परिवर्तित होण्याची लुप्त झालेली क्षमता, कदाचित या अपयशांच्या मालिकांमुळे स्वकीयांकडून वा स्थानिक पातळीवर सततचा अव्हेर नि अपमान सोसावा लागणारी एक अवाढव्य प्रजा गुजरात, पंजाब आणि देशात मौजूद आहे. यांतील काहींना सरकारकडून आजही मिळणारे मोफत धान्य म्हणजे ‘भीक’ वाटत असेल. त्यापेक्षा सारे काही कुर्बान करून अमेरिकेची वाट धरलेली बरी, असा विचार करणारे या देशात असंख्य आढळतात हा धोरणकर्त्यांचा पराभव ठरतो. अमेरिकेकडून यापूर्वीही भारताची सरकारी पातळीवर निर्भर्त्सना झाल्याचे प्रसंग कमी नाहीत. डुकरांसाठीचा निकृष्ट गहूपुरवठा, इंदिरा गांधींविषयी निक्सन प्रशासनाच्या काळात व्यक्त झालेली आक्षेपार्ह टिप्पणी असे काही मासले देता येतील. परंतु तो काळ आणि आजचा काळ यात फरक झाल्याचे आपण धरून चालतो. भारत-अमेरिका संबंध यापूर्वी कधी नव्हते इतके सुधारल्याचे आपल्याला सांगितले जाते. म्हणूनच बहुधा, पूर्वी कधी दिसून आली नाही इतकी अवमानकारक वागणूक दिली जाऊनही आपण खुल्या दिलाने आपल्या मित्राला माफ करतो. ‘डंकी’ मार्गाने गेलेल्यांच्या पाठवणीच्या निमित्ताने ‘माय फ्रेंड’ ट्रम्प यांचा डंख सहन करतो.

# धारूर शहराचा पाणीपुरवठा पंधरा दिवसापासून बंद

## पालिकेचा ढिसाळ कारभार उघड, नागरिकांवर पाणी विकत घेण्याची वेळ

किल्ले धारूर, (प्रतिनिधी):-धारूर शहरातील नागरिकांना नगरपरिषदेच्या वतीने करण्यात येणारा पाणीपुरवठा मागील पंधरा दिवसापासून बंद आहे. यामुळे येथील नागरिकांची पाणी वाचून गैरसोय होत आहे. सांडपाण्याची इंधन विहीर, बोर, आड व बारा यांच्या माध्यमातून गरज भागत असली तरी पिण्याच्या पाण्याची गैरसोय होत असल्याने नागरिकांना विकत पाणी घ्यावे लागत आहे. दोन दोन पाणीपुरवठा योजना असताना नागरिकांना पाणी मिळत नसल्याने नगरपरिषदेचा ढिसाळ कारभार उघड्यावर आला आहे. धारूर नगरपरिषदेच्या वतीने शहरातील नागरिकांना घनेगाव पाणीपुरवठा योजना आणि धारूर येथील साठवण तलाव या दोन योजनेवरून पाणीपुरवठा केला जातो. केलेल्या पाणीपुरवठ्याच्या मोबदल्यात नगर परिषदेकडून वर्षाकाठी दोन हजार रुपये पाणीपुरवठा कर म्हणून आकारला जातो. मात्र मागील पंधरा दिवसापासून धारूर शहरवासियांचा पाणीपुरवठा खंडित आहे. शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही




योजनेवरील तलावावरील मोटारमध्ये बिघाड झाल्याचे नगरपालिकेच्या वतीने सांगण्यात येत आहे. एकाच वेळी दोन्ही योजनेवरील मोटारात असा काय बिघाड झाला असा प्रश्न धारूर शहरातील नागरिकांना पडत असून नगरपरिषदेतील पाणीपुरवठा विभाग पाणीपुरवठेच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करीत आहे का असाही प्रश्न नागरिक करीत आहेत. पंधरा पंधरा दिवस नळाला पाणी येत नसेल तर दोन योजना कशाच्या कामाच्या का केवळ दिखाव्यासाठी या योजना आहेत, असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होत आहे, नागरिकांची पाणी वाचून चांगलीच धांदल उडत असून अक्षरशा उन्हाळा सुरू होण्यापूर्वीच धारूर शहरातील नागरिकांना पाणी विकत घेण्याची वेळ येऊन ठेपली आहे. आत्ता अशी परिस्थिती आहे तर भर उन्हाळ्यात कशी परिस्थिती असेल हा येणारा हा येणारा काळच सांगणार आहे. असे असले तरी लवकरात नळाला पाणी सोडण्याची मागणी येथील नागरिक करीत आहेत.

# लॉर्ड महावीर इंग्लिश स्कूलच्या चिमुकल्यांनी बनविले रॉकेट मॉडेल



कडा, (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यामध्ये प्रथमच महावीर इंग्लिश स्कूल कडा यांच्या वतीने आणि इग्नाईटिंग ड्रीम्स ऑफ यंग माईंडस फाउंडेशन यांच्या सहकार्याने जी भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्रो) अंतर्गत कार्य करत आहे. मुलांमध्ये कौशल्य क्षमता विकसित करणे, मुलांचा वैज्ञानिक दृष्टीकोन वाढविणे त्याचबरोबर मुलांमध्ये अवकाश विज्ञानाविषयी आवड निर्माण व्हावी याकरिता शनिवार दिनाक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी एकदिवसीय अंतरीक्ष ज्ञान अभियान या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांनी श्री.रविशंकर कुमार सर, श्री.रत्नेश सोनी सर आणि श्री.नवीन सर या इस्रो टीमच्या मार्गदर्शनाखाली अगरबत्ती बॉक्स, पोर्टेशियम नायट्रेट, शुगर, चारकोल, पुठ्ठा, चिकट टेप सह इतर वस्तूपासून रॉकेट तयार करून त्यांचे अवकाशात यशस्वी सामूहिक प्रक्षेपण केले. या कार्यशाळेमध्ये एकूण १५० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता, यामध्ये एकूण २८ रॉकेट तयार करण्यात आले होते या सर्व रॉकेटने गगन भरारी घेतली. अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम संपन्न झाला. अश्या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांना नव-नवीन गोष्टी शिकायला मिळाल्या याचा आनंद मुलांच्या चेहऱ्यावर दिसून येत होता. सर्वच विद्यार्थ्यांनी खुप मेहनत घेऊन हे रॉकेट बनविले व जेव्हा हे रॉकेट आकाशात उडत होते तेव्हा या विद्यार्थ्यांचा आनंद हि गगनाला भिडल्या सारखा दिसून येत होता. या आनंदाच्या क्षणांना उपस्थितांच्या टाळ्यांच्या कडकडाटाने विद्यार्थ्यांच्या आनंदाला द्विगुणित केले. या कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष श्री.अमितजी राठोड, उपाध्यक्ष श्री. संदिपजी चानोदिया, सचिव श्री. हेमंतजी मेहेर, कोषाध्यक्ष श्री.डॉ. प्रमोदजी भळगट, श्री.मनिषजी गांधी, श्री. प्रकाशजी श्रीश्रीमाळ, श्री.अमोलजी पटवा, श्री. संजयजी पितळे, श्री संतोषजी गांधी सल्लागार श्री. पी.जी. मेहेर सर, मुख्याध्यापक के.अभिलाष सर उपस्थित होते. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने कडा आणि कडा परिसरातील पालकवर्ग आणि शिक्षणप्रेमी नागरिक उपस्थित होते.

पान १ वरून

### सोयाबीन उत्पादक...

२०२४-२५ मधील हमीभावाने सोयाबीन खरेदीला मुदतवाढ दिल्यास सर्व शेतकऱ्यांकडील सोयाबीन खरेदी होवू शकते याकडे लक्ष वेधत आ.संदीप क्षीरसागर यांनी याबाबतच्या पत्रात नमूद केले आहे की, केंद्र शासनाच्या व महाराष्ट्र शासनाच्या संदर्भीय धोरणानुसार सुरूवातीला दि.३१ जानेवारी २०२५ पर्यंत त्यानंतर दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सोयाबीन खरेदीच्या बाबतीत मुदतवाढ देण्यात आली होती; परंतु बीड विधानसभा मतदारसंघासह जिल्ह्यातील नोंदणीधारक शेतकरी ४४ हजार ७०० च्या वर आहेत. त्यापैकी दि.६ फेब्रुवारी २०२५ पर्यंत किमान २१ हजार शेतकरी बांधवांककडून सोयाबीन खरेदी झालेली आहे. बीड मतदार संघासह जिल्ह्यातील किमान ४० टक्क्याच्यावर शेतकरी बांधवांची खरेदी अजूनही शिल्लक आहे. त्यामुळेच या सर्व शेतकरी बांधवांच्या सोयाबीनची खरेदी करण्यासाठी मुदतवाढ द्यावी व त्यातून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी महत्वाची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे. निवेदनातच्या प्रती राज्याचे मुख्य सचिव व अवर सचिवांनाही पाठवण्यात आल्या आहेत. आ.संदीप क्षीरसागर यांनी सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे प्रश्न राज्य शासनापर्यंत पोहचवले आहेत. आता शासनाकडून मुदतवाढीचा निर्णय कधी होतो याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे.

### शिवजन्मोत्सव सोहळ्यात....

शिवशाही चे आयोजन करण्यात आलेले आहे. या नाटकांमध्ये राजमाता जिजाऊ म्हणून सिनेतारका अलका कुबल, छत्रपती शिवाजी महाराज सिने कलावंत शंतनू मोघे, हंबीरराव मोहिते नाट्य अभिनेते प्रकाश धोत्रे, कागा भट्ट महेश कोकाटे, संत तुकाराम महाराज रमेश रोकडे, बाजीप्रभू देशपांडे राजेश आहेर, हे भूमिका सादर करणार असून यात २५० सहभागी कलाकार सहभागी होणार आहेत. सुप्रसिद्ध लेखक तथा नाट्यनिर्माते महेंद्र महाडिक दिग्दर्शित शिवशाही या महानट्याचे ५५ फुटाचा हायड्रोलिक सेट हे वैशिष्ट्य आहे. शिवजयंतीच्या दिनी शुभारंभाचा मुख्य शो १९ फेब्रुवारी रोजी मान्यवरांच्या उपस्थित होणार असून हा शो सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला आहे. २० फेब्रुवारी रोजी फक्त महिलांसाठी तर २१ फेब्रुवारी रोजी फक्त विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आला आहे. प्रेक्षकांसाठी खुर्च्यांची बैठक व्यवस्था करण्यात येणार असून शिवशाही महानाट्य व शिवजन्मोत्सव सोहळ्याची जय्यत तयारी करण्यात येत असलेल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

### नाट्यमंच, मंडप उभारणी...

सरपंच शितल साखरे, शिवजन्मोत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, सहकार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्ष संतोष सुतार, उपाध्यक्ष अँड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिव राहुल मस्के, सहसचिव शहादेव निकम, कोषाध्यक्ष पप्पू पठाण, सह कोषाध्य

पान १ वरून

रणजित घुंबार्डे, कार्यकारणी सदस्य प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रब्बी हंगामात...

आहे. एक्करी उत्पन्न सहा ते सात क्विंटल असून त्याचा दर सध्या कमीत कमी पस्तीस ते चाळीस हजार रुपये क्विंटल आहे. तसेच चियाबीज खाल्ल्याने वजन कमी करण्यास मदत होते. तर फायबरचे प्रमाण जास्त असल्याने पचनशक्ती वाढते यासारखे अनेक औषधी गुणधर्म या पिकामध्ये आहेत. तर भारतात उत्तरेकडील राज्यात याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते.

### तर आपला एक वेगळा...

लोक गुणांचा स्वीकार करतात, लोक मुंडे साहेबांच्या गुणांवर प्रेम करतात, त्यामुळे गुणांचा वारसा स्वीकारून ते माझ्याशी जोडले गेले, असे पंकजा मंडे म्हणाल्या. तसेच मुंडे साहेबांनी भारतीय जनता पार्टी पक्षाच्या जन्मापासून काम केले आणि तो पक्ष खऱ्या अर्थाने त्यांनीच उभा केला, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या. महाराष्ट्रात भाजप रुजविण्याचे काम गोपीनाथ मुंडे यांनीच केले, असेच त्यांनी थेटपणे सांगण्याचा प्रयत्न केला. शहरीकरण आणि नागरीकरण वाढत असताना पर्यावरणाचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यक आहे. पर्यावरणाचे रक्षण आणि नद्या पुनर्जीवित करीत पर्यावरण संवर्धनासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन यावेळी केले.

### जरांगेंचा मेहुणा...

आंदोलनात केलेली जाळपोळ यासह सरकारी कामात अडथळा आणण्याचे जालना जिल्ह्यात गुन्हे दाखल आहेत. २०१९ पासून वेगवेगळ्या प्रकरणात हे गुन्हे दाखल आहेत. अंबड उपविभागीय न्यायदंडाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये ही तडीपारीची कारवाई करण्यात आली असून आणखीही कारवाईचे प्रस्ताव विचाराधीन असल्याची देखील माहिती मिळत आहे. ❋ यांच्यावर झालीय तडीपारीची कारवाई : १) विलास हरिभाऊ खेडकर, २) केशव माधव वायभट, ३) संयोग मधुकर सोळुंके, ४) गजानन गणपत सोळुंके, ५) अमोल केशव पंडित, ६) गोरख बबनराव कुरणकर, ७) संदीप सुखदेव लोहकरे, ८) रामदास मसूरराव तौर ९) वामन मसुरराव तौर

### व्हॉईस ऑफ मीडियाच्या...

त्यानंतर पत्रकार दिनेश लिंबेकर, सुनील यादव, अमोल मुळे, ज्ञानेश्वर वायबसे, केशव कदम, शुभम खाडे, डॉ.गणेश ढवळे, धनंजय जोगडे आदींनी धांडेंच्या नावाला सहमती दर्शविली. त्यानंतर व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांनी जालिंदर धांडे यांची जिल्हाध्यक्षपदी निवड जाहीर केली. या निवडीबद्दल त्यांचे बीड जिल्ह्यातील सर्व पत्रकार बांधवांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

पान ४ वरून

### शरिरावर घाव...

मोहम्मद सलीम या ५५ वर्षांच्या ट्रक चालकाचा मृतदेह आढळला. या मृतदेहाच्या शरिरावर मोठे घाव आहेत, तर तोंडाला गमजाने बांधलेलं आहे, त्यामुळे घातपाताचा संशय व्यक्त केला आहे. बीड जिल्ह्यातील वाढती गुन्हेगारी चिंतेचा विषय बनली आहे. गुन्हेगारांना पोलिसांचा धाक नाही का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमधील गुन्हेगारीने महाराष्ट्रातील राजकारण तापलं. आवादा कंपनीकडे मागितल्या गेलेल्या खंडणीला विरोध केला म्हणून संतोष देशमुख यांची हत्या झाल्याचं प्राथमिक तपासात समोर आलं, याप्रकरणी वाल्मिक कराडला अटक करण्यात आली आणि त्याच्यावर मोक्का लावला गेला. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येनंतर बीड जिल्ह्यातील गन कल्चरची प्रकरणंही समोर येऊ लागली. परवाना नसतानाही बेधडकपणे बंदूक दाखवून दहशत माजवणारे अनेक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. काहीच दिवसांपूर्वी वाल्मिक कराड आणि धनंजय मुंडेंच्या विरोधातल्या बातम्या बघतो म्हणून एका तरुणावर जीवघेणा हल्ला केला गेला, ज्यात हा तरुण गंभीर जखमी झाला.

### सहकारातील अडचणींवर...

मदत करत नाहीत, नियमाचा बडगा दाखवतात, त्या ठिकाणी सहकारी संस्थांनी अनेकांना उभे केले आहे. त्याचप्रमाणे सहकारी साखर कारखान्यांचे काम देखील शेतकरी पोषक ठरलेले आहे. सध्या राज्यात सहकारावर अनेक कार्यक्रम होत आहेत. सहकार दिंडी देखील महाराष्ट्रभर फिरत आहे. त्याचाच एक भाग म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### सार्वजनिक शिवजयंती...

माहिती देत शिवजयंती उत्सवाची रूपरेषा आणि उत्सवाला अभिप्रेत असणा-या बाबी मांडल्या. डॉ.गणेश ढवळे यांनी गतवर्षी प्रमाणेच डीजेमुक्त शिवजयंती साजरी करत विविध पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखुन पोलिस प्रशासनाला सहकार्य करत आदर्शवत शिवजयंती साजरी करण्याचे आवाहन केले. यावेळी ग्रामपंचायत्या वतीने अध्यक्षपदी निवड झालेले अशोक वाणी व ईतर पदाधिकाऱ्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मोठ्या संख्येने उपस्थित ग्रामस्थांकडून निवडीचे स्वागत करण्यात आले.

### सोयाबीनचे दर वाढत...

घरी सोयाबीन पडून असल्याचे चित्र सध्या धारूर सह जिल्ह्यात सर्व ठिकाणी दिसून येत आहे. चालू हंगामात शासनाकडून ४८९२/- रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला होता. मात्र, व्यापाऱ्यांच्या मनमानी पद्धतीने व शासनाच्या अटींमुळे शेतकरी वर्ग मेटाकुटीला आला आहे. व्यापाऱ्यांकडून सोयाबीनला सुरुवातीच्या काळात चार हजार तीनशे रुपये पर्यंत दर मिळाला. मात्र, हे दर दिवसेंदिवस घटत असल्याने सद्यस्थिती सोयाबीनचे भाव चार हजाराच्या दरम्यान आले आहेत. सोयाबीनचे भाव वाढण्याऐवजी दिवसेंदिवस कमी होत असताना शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग आर्थिक संकटात सापडला आहे.

# दमानियांचा फडणवीस आणि अजितदादांवर गंभीर आरोप

मुंबई, (वृत्तसेवा):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येला दोन महिने झाली आहेत. यापार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी देशमुख कुटुंबियांना न्याय मिळणार नाही, अशी भीती व्यक्त केली आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत. तसेच मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरही त्या ठाम आहेत. दमानिया यांनी रविवारी सोशल मीडियात एक पोस्ट करत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. सामान्य लोकांना (देशमुख कुटुंबाला) खरंच न्याय मिळेल का?, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. त्यासाठी त्यांनी दोन घटनांचा उल्लेख केला आहे. ९ तारखेला काळ्या स्कॉर्पिओ गाडीतून २ मोबाईल मिळाले होते. त्यात एका बड्या नेत्याचा फ़ोन आला होता, अशी बातमी माध्यमांनी दाखवली होती. मोबाईल डेटा रिट्रीव करण्यासाठी फॉरेंसिक मधे पाठवण्यात आला होता, आता २ महिने झाले. कधी मिळणार तो डेटा? कधी कळणार, त्या नेत्यांचे नाव? आणि त्यांना वाचण्यासाठी कराड सुद्धा सुटणार, अशी भीती वाटत असल्याचे दमानियांनी पोस्टमध्ये म्हटले आहे. दुसरं म्हणजे, १९ जुनला सातपुडा या शासकीय बंगल्यात आवदा कंपनी बरोबर ३ कोटीचा व्यवहार झाला असे धस म्हणाले होते, मग त्यात पुढे काय चौकशी झाली? काय स्टेटमेंट घेतली? अवादा च्या कर्मचाऱ्यांचे स्टेटमेंट घेतली का? मग धनंजय मुंडे यांच्यावर का गुन्हा झाला नाही?, असे सवालही त्यांनी केले आहेत. संतोष देशमुख यांना जाऊन दोन महिने झाले. अनेक गोष्टी लपवल्या जात आहेत. त्या मोठ्या नेत्याच्या दबावामुळे चौकशी होत नाही असे मला वाटायला लागले आहे. अवादा कंपनी खंडणी प्रकरणात धनंजय मुंडेही सहभागी आहेत. म्हणून ही चौकशी नीट होणार नाही. त्यामुळे मुंडे आणि कराडांनाही काही होणार नाही. म्हणून हे मी लावून धरत आहे. त्यांची सर्व प्रकरणे मी बाहेर आणली, असेही दमानियांनी म्हटले आहे. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार त्यांची पाठराखण करत आहेत. त्यांना राजकारणातून बाहेर पडू द्यायचं नाही. आणि म्हणूनच त्यांचे मित्र म्हणून त्यांना ती कारवाई करायची नाही, असा आरोप दमानिया यांनी केला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# राहुल सोलापूरकरचे तोंड फोडा आणि १ लाख बक्षीस मिळवा



## ठाकरे गटाच्या नेत्याचं वक्तव्य

मुंबई, (वृत्तसेवा) :-अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबाबत केलेल्या वादग्रस्त वक्तव्यावरुन वाद निर्माण झाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्यावरुन पेटाऱ्यात बसून नव्हे तर लाच देऊन सुटले होते, अशा आशयाचे वक्तव्य सोलापूरकर यांनी केले होते. त्यांच्या या वक्तव्यावर विविध स्तरातून टीका होत आहे. राहुल सोलापूरकरचे तोंड फोडा आणि १ लाख बक्षीस मिळवा, अशी घोषणा शिवसेना ठाकरे गटाचे उपनेते शरद कोळी यांनी केलीय. शिवाजी महाराज आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याबाबत वादग्रस्त विधान करणाऱ्या सोलापूरकरला फोडून काढा असा इशारा शरद कोळी यांनी दिला आहे. राहुल सोलापूर जिथे दिसेल तिथे त्याचे तोंड चपलीने रंगवणाऱ्या व्यक्तीला १ लाखाचे बक्षीस मी जाहीर करत असल्याचे कोळी म्हणाले. छत्रपती शिवाजी महाराज आग्र्याहून सुटले, मिठाईचे पेटारे-बिटारे काही नव्हते. चक्क लाच देऊन महाराज आले आणि त्यासाठी किती हुंडा वटवल्या आहेत, याचेसुद्धा पुरावे आहेत. अगदी औरंगजेबाच्या वजिराला आणि त्याच्या बायकोलासुद्धा महाराजांनी लाच दिलेली आहे. मोहसिन खान का मोईन खान नाव आहे बहुतेक त्याचं.. त्याच्याकडून अधिकृत शिक्क्याचे परवाने घेऊन सगळे बाहेर पडलेत. स्वामी परमानंद पाच हत्ती घेऊन शेवटचे गेले, त्याच्या परवान्याची अजूनही खूण सुद्धा आहे. लोकांना गोष्टी रुपात सांगताना काहीतरी रंजक करून सांगावं लागतं. मग ती रंजकता आली की इतिहासाला छेद दिला जातो किंवा बाजूला टाकला जातो, असं ते एका मुलाखतीत म्हणाले होते.

# छत्तीसगडमध्ये मोठी कारवाई तब्बल ३१ नक्षलवाद्यांचा खात्मा

**दोन जवान शहीद!**

छत्तीसगड (वृत्तसेवा):- छत्तीसगडच्या बीजापूर जिल्ह्यात रविवारी जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत तब्बल ३१ नक्षलींचा खात्मा झाला. बस्तरचे आयजी सुंदरराज यांनी सांगितले की, चकमकीदरम्यान चार जवान गंभीर जखमी झाले होते. त्यापैकी दोघांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला. तर अन्य दोघांवर उपचार सुरू आहेत. सुंदरराज यांनी सांगितले की इंद्रवती राष्ट्रीय उद्यान क्षेत्रातील जंगलात बीजापूर आणि नारायणपूरशी लगत असलेल्या महाराष्ट्र सीमेवर रविवारी सकाळी त्यावेळी चकमकी सुरू झाली, जेव्हा जवानांचे एक पथक नक्षलविरोधी मोहिमेवर होते. बस्तर पोलिसांनी सांगितले की परिसरात शोध मोहीम सुरू आहे. आयजीपी सुंदरराज यांनी सांगितले की ठार करण्यात आलेल्या नक्षलींची संख्या जास्तही असू शकते. चकमकीच्या ठिकाणाहून ऑटोमॅटिक हत्यारं आणि स्फोटकं जप्त केली गेली. छत्तीसगडमध्ये सुरक्षादल सातत्याने नक्षलवाद्यांविरोधात मोहीम राबवत आहेत. डीआरजी बाजापूर, एसटीएफ, सी-६० चे जवान परिसरात शोधमोहीम राबवत आहेत. बीजापूरमध्येच १ फेब्रुवारी २०२५ रोजी गंगालूर भागात पोलीस आणि नक्षलींमध्ये चकमक झाली होती. यामध्ये आठ नक्षली मारले गेले होते. मागील महिन्यात २०-२१ जानेवारी दरम्यान छत्तीसड आणि ओडिशाच्या सीमेवर गरियाबंद जिल्ह्यातील जंगलात सुरक्षा रक्षकांसोबत झालेल्या चकमकीत १६ नक्षली मारले गेले होते. यामध्ये ९० लाखांचा इनाम असलेल्या चलपतीचा देखील समावेश होता. पी सुंदरराज यांनी मीडियाशी बोलताना सांगितले की, यावर्षी १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत राज्यात झालेल्या विविध चकमकींमध्ये ५० पेक्षा जास्त नक्षलवाद्यांचा खात्मा झाला. छत्तीसगड पोलिसांच्या मते राज्यात भाजप सरकार बनल्यापासून आतापर्यंत झालेल्या विविध चकमकीत जवानांनी २०१९ नक्षलींना ठार केले होते.

# संतोष देशमुखांचा मारेकरी कृष्णा आंधळेला धनंजय मुंडेंनी लपवून ठेवलंय



## मनोज जरांगेंचा खळबळजनक आरोप

जालना, (प्रतिनिधी) :-बीड येथील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला रविवारी (दि. ०९) दोन महिने पूर्ण झाले आहेत. पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत आठ आरोपींना अटक केली आहे. तर कृष्णा आंधळे हा आरोपी अजूनही फरार आहे. आता यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी खळबळजनक आरोप केलाय. संतोष देशमुखांचा मारेकरी कृष्णा आंधळेला धनंजय मुंडेंनी लपवून ठेवलंय, असे त्यांनी म्हटले आहे. जालना येथे पत्रकारांची संवाद साधताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, तपास तर सुरू आहे आता नुसते धरू म्हणतात. अजूनही आरोपी सापडलेले नाहीत. एक तर पळून गेलाय की धनंजय मुंडेनी लपवून ठेवलंय. प्रकरणातील दुसरा मोबाईल सापडायला तयार नाही, तो धनंजय मुंडेकडे मोबाईल देऊन गेला की काय? अजून उज्ज्वल निकम यांची नियुक्ती झालेली नाही. जे आरोपी खुनात आणि खंडणीत करायला पाहिजे होते ते केले नाही. खंडणीतल्या आरोपीला आयसीयूमध्ये आणले जाते. मग महादेव गीतेबद्दल सरकारला आणि धनंजय मुंडेला काय वाटत नाही का? तुम्ही बाकीच्यांना सहआरोपी का करत नाही? असे म्हणत त्यांनी राज्य सरकारवर तोफ डागली.

# खरेदी केंद्राची संख्या वाढवून शेतकऱ्यांची सोयाबीन हमीभावाप्रमाणे घ्यावी-पवार

## सोयाबीनप्रश्नी जनसंग्राम संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा

परळी (प्रतिनिधी):- बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सोयाबीन गेल्या महिन्यापासून घरामध्ये पडून आहे. सोयाबीनला योग्य भाव नसल्याने शेतकरीराजा संकटात सापडला आहे. शासनाने हमीभावाचे परिपत्रक काढूनही सोयाबीनला योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरीराजा आर्थिक संकटात सापडला आहे. शेतकऱ्यांच्या सोयाबीनला योग्य भाव मिळाला पाहिजे. शासनाने सोयाबीन खरेदी केंद्राची कॅपॅसिटी वाढवावी शेतकऱ्याची सोयाबीन हमीभावाने खरेदी करावे. अशी मागणी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी केली आहे. या बाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सोयाबीन गेल्या अनेक महिन्यापासून योग्य भाव मिळत नसल्याने पडून आहे.गेल्या तीन-चार वर्षापासून सोयाबीनचा भाव वाढत नाही. रात्रंदिवस हाडाची काड करून प्रचंड काबाडकष्ट करूनही सोयाबीनला भाव मिळत नाही. विकलं तर पिकत नाही आणि पिकलं तर विकत नाही. त्याला योग्य हमीभाव मिळत नाही. अशा अवस्थेत बीड जिल्ह्यातील शेतकरी राजा जगत आहे. शासनाने खरेदी केंद्राची संख्या वाढवून शेतकऱ्यांची सोयाबीन खरेदी करावी. जे खरेदी केंद्र चालू आहेत. त्या खरेदी केंद्राची कॅपॅसिटी वाढवून खरेदी करावी. खरेदी केंद्र चालू आहेत त्या केंद्रावर सौयाबीन चाळणाऱ्या मशीन ची संख्या वाढवावी. २०२४-२०२५ चा केंद्र शासनाचा हमीभाव रुपये ४८९२/- आहे. जे व्यापारी सोयाबीन हमीभावाने खरेदी करणार नाहीत. त्या व्यापाऱ्यावर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे लायसन्स रद्द करावे. केंद्र शासनाने शेतकरी यांच्या घरातील सोयाबीन संपेपर्यंत खरेदी केंद्र चालू ठेवावे. अन्यथा या प्रश्न लवकरच लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही जनसंग्राम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष तुळशीराम पवार यांनी दिला आहे.

# पोलिस समोरून आले जुगारी पाठीमागील दरवाज्यातून पळाले

## परळी तालुक्यातील घटना

परळी, (प्रतिनिधी) :-तालुक्यातील धर्मापुरी येथील बस स्थानक रोडवर एका इमारतीमध्ये मोबाईलवर ऑनलाईन कल्याण मुंबई नावाचा जुगार चालू असल्याची खबर पोलिसांना मिळाली. यावरून परळी ग्रामीण पोलिसांच्या एका पथकाने शुक्रवारी रात्रीच्या सुमारास या जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस आल्याची चाहूल लागल्याने जुगारी पाठीमागील दरवाजातून पसार झाले. तेवढ्यात समोरील दरवाजातून पोलिस दाखल झाले. जुगारी हाती लागले नाही, पण पोलिसांनी यावेळी तीन लाख २३ हजार रुपये ८० रुपये किमतीचे जुगार साहित्य व रोख रक्कम जप्त केली आहे. याप्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात ८ फेब्रुवारी रोजी पहाटे जगन्नाथ फड, शिवाजी पांचाळ, अक्षय सावंत ( राहणार धर्मापुरी) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शनिवारी दुपारपर्यंत यातील एकाही आरोपीस अटक करण्यात आली नव्हती. याबाबत पोलीस सूत्रांनी दिलेली माहिती अशी; धर्मापुरी येथील बस स्थानकाजवळ एका इमारतीमध्ये मुंबई -कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळविला जात असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यावरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार पोलीस उपनिरीक्षक रियाज शेखलाल, निमोणे व पोलीस हेड कॉन्स्टेबल पांडुरंग वाले, पोलीस कर्मचारी चेमटे, वाहन चालक महादेव वाघमारे व इतर कर्मचाऱ्यांनी सात फेब्रुवारी रात्री सव्वानऊ वाजेच्या सुमारास जुगार अड्ड्यावर छापा टाकला. मात्र, पोलीस पथक आल्याचे समजताच जुगार चालक आणि जुगारी पाठीमागील दरवाज्यातून उड्या टाकून पळून गेले. त्यामुळे एकही आरोपी पोलिसांच्या हाती लागला नाही. दरम्यान, पोलिसांनी मटका जुगाराचे साहित्य व दोन प्रिंटर, एक लॅपटॉप, रोल्स मशीन एलईडी टीव्ही, वाय-फाय राऊटर ११ खुर्चा, तीन टॅब दोन मोबाईल असा एकूण तीन लाख २३ हजार रुपयाचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक अनमोल केदार हे करीत आहेत. परळी तालुक्यातील धर्मापुरी येथे गेला काही दिवसापासून जुगार चालू होता.

# संतोष देशमुख प्रकरणात केज पोलीसांना सहआरोपी का केलं नाही?

## खासदार बजरंग सोनवणेंचा सवाल

बीड, (प्रतिनिधी):- मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाला दोन महिने पूर्ण होत आहेत .या दोन महिन्यांमध्ये मी देशाचे गृहमंत्री अमित शहांकडे पहिल्यांदा या प्रकरणाच्या तपासा संदर्भातली मागणी केली .त्यानंतर या प्रकरणी गुन्हे दाखल होऊन तपासाला वेग आला .या प्रकरणात कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे .या प्रकरणाचे पुरावे नष्ट करण्यासाठी आरोपी पोलीस पकडत नाहीत का ? असा सवाल खासदार बजरंग सोनवणे यांनी उपस्थित केलाय .तसेच एकीकडे संतोष देशमुख हत्या प्रकरणामुळे कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरही बीड जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी कोणत्या पोलिसांवर कोणती कारवाई केली हे अद्याप आम्हाला कळत नाही. केज पोलीस अधिकारी हे संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहआरोपी का केले जात नाहीत? असा सवालही त्यांनी केला. ज्या दिवशी या सगळ्या आरोपींना फाशी होईल त्याच दिवशी मी समाधानी होईल असं खासदार बजरंग सोनवणे म्हणालेत. गेल्या काही दिवसांपासून संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख हेही पुरावे नष्ट करण्याचे हे प्रशासनाचेच षडयंत्र असल्याचा आरोप करत आहेत .हत्या होऊन आता दोन महिने लोटले आहेत .यात केज पोलीस अधिकारी हे संतोष देशमुख हत्या प्रकरणात सहा आरोपी का केले जात नाहीत असा सवाल बजरंग सोनावणे यांनी केलाय. ज्या दिवशी या सगळ्या आरोपींना फाशी होईल त्याच दिवशी मी समाधानी होईल. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिने पूर्ण होत आहेत या दोन महिन्यांमध्ये मी देशाचे गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे पहिल्यांदा या प्रकरणाचा तपास करण्याच्या संदर्भातली मागणी केली आणि त्यानंतर या प्रकरणी गुन्हे दाखल होऊन तपासाला वेग आला.

# ‘हे’ चाळे रोखायलाच हवेत!

काळ जसा सरत गेला तसा देश आधुनिकीकरणाकडे मार्गक्रमण करू लागला. माणसाचे राहणीमान उंचावू लागले. पूर्वी कधीतरी लग्न समारंभात किंवा मोठ्या कार्यक्रमात दिसणारी सुटाबुटातील माणसे आता लोकल ट्रेनमध्येही दिसू लागली आहेत. पूर्वी खासगी गाड्या कमी असल्याने रस्ते ओस असायचे, आता शहरासारख्या ठिकाणी गाड्या एव्हढ्या वाढल्या आहेत कि रस्ते कमी पडू लागले आहेत. लँडलाईन, पीसीओ, पेजर जाऊन मोबाईल आले, आता त्यातही क्रांती होऊन सर्वांना परवडणारे स्मार्ट फोन प्रत्येकाकडे आले. घरोघरी स्मार्ट टीव्ही आले, फ्रिज आणि धुलाई यंत्र आले. शहरांमध्ये आता चाळींतूनही घरोघरी वातानुकूलित यंत्रे(एसी) बसवली जाऊ लागली आहेत. प्रत्येकाच्या हाती स्मार्ट फोन आला आणि त्यामध्ये अनलिमिटेड डाटा पॅकही आला. सोशल मीडियाचे अनेक प्लॅटफॉर्म्स तयार झाले त्यावर प्रतिदिन रेंगाळणाऱ्यांची संख्याही वाढली, शेजारपाजारचे ४-५ मित्र दुरावले आणि सामाजिक माध्यमांवर हजारोंच्या संख्येने मित्र आणि फॉलोअर्स जोडले गेले. दुरदर्शनचा काळ संपला, वेगवेगळे चॅनल्स आले, आता तर ओटीटी प्लॅटफॉर्म्स सुद्धा आले. युट्युबचा पसारा अवास्तव वाढला आणि या युट्युबवरील चित्रपट, मालिका, खेळांचे सामने, खाद्यपदार्थांच्या रेसिपी, इंटरनेटच्या साहायाने स्मार्ट टीव्हीवर मोठ्या स्क्रीनवर पाहण्याची सुविधा उपलब्ध झाली. ओटीटी प्लॅटफॉर्म्सवर नवनवीन चित्रपट आणि वेब सिरीज यांचे अक्षरशः पेव फुटले. एक काळ असा होता जेव्हा चित्रपटात प्रेमप्रसंग दाखवण्यासाठी दोन फुलांचा वापर केला जात असे, आता काळ इतका पुढे गेला आहे की चित्रपट परीक्षण मंडळाकडून 'अ प्रमाणपत्र' घेऊन शयनगृहातील प्रणयदृश्ये खुलेआमपणे पडद्यावर दाखवली जाऊ लागली आहेत. आयटम साँग , चुंबनदृश्ये, शिव्यांचा मुक्त वापर आणि भडक दृश्यांशिवाय हल्लीचे चित्रपट पूर्णत्वाला येतच नाहीत. ओटीटी प्लॅटफॉर्म्सना सेन्सॉरचेही बंधन नसल्याने येथील प्रौढांसाठी बनवण्यात आलेल्या वेब सिरीज शाळेतील मुलेही आपल्या स्मार्ट फोन्सवर चवीने पाहू लागली आहेत. चित्रपटातील अभिनेत्रींचा तोकड्या कपड्यांतील वावर आताच्या तरुणींना स्टाईल स्टेटमेंट वाटू लागले आहे. त्यामुळे महाविद्यालयात आणि कार्यालयांत तोकडे कपडे घालून जाणाऱ्या अनेक तरुणी प्रतिदिन बस, रेल्वे आणि रहदारीच्या ठिकाणी दिसू लागल्या आहेत. पौगंडावस्थेतच मुलांच्या हाती स्मार्ट फोन्स आल्याने त्यावर पॉर्न चित्रपट पाहणाऱ्या मुलांचे प्रमाणही गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहे. पूर्वी कधीतरी निर्जन स्थळी दिसणारी प्रेमी युगुले आज गर्दीच्या, रहदारीच्या ठिकाणी सर्रासपणे दिसू लागली आहेत. ट्रेन, बस, पादचारी पूल, स्कायवॉक, बगीचे, तळी, नदी-समुद्र किनारे, बस आणि रेल्वे स्थानक यांवर यांचे चाळे सर्वांदेखत सुरु असतात. यामध्ये १५-१६ वर्षांच्या मुला-मुलींचाही सहभाग असतो. चित्रपट-मालिकांमध्ये दाखवण्यात येणारी भडक प्रणयदृश्ये, मुलांच्या हाती आलेले स्मार्ट फोन्स, त्यांवरील इंटरनेटचा स्वैर वापर, पालकांनी मुलांना दिलेली अवास्तव मोकळीक आणि मुलांवरील पाश्चिमात्य संस्कृतीचा वाढता प्रभाव ही यामागील प्रमुख कारणे आहेत. सध्या सुरु असलेला 'व्हॅलेंटाईन वीक' म्हणजे यांच्यासाठी पर्वणीच आहे. रोजच्या रहदारीच्या वाटेवरील यांचे चाळे पाहून सभ्य माणसे त्यांच्याकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करताना आढळतात, पालक आपल्या लहान मुलांची नजर त्यांच्यावर पडणार नाही याची काळजी घेताना दिसतात; मात्र त्यांना हटकण्याचा किंवा जाब विचारण्याचा प्रयत्न करताना कुणीच दिसत नाहीत. एखादी संस्कृतीरक्षक संघटना यांच्यावर कधीतरी धडक कारवाई करण्याचा प्रयत्न करते, तेव्हा समाजातील तथाकथित प्रेमाचे ठेकेदार जागे होतात आणि आणि या चाळ्यांना विरोध करणाऱ्यांना तालिबान्यांची उपमा देऊन यांच्यावर प्रसिद्धी माध्यमांतून गळे काढतात. पोलीसही या चाळ्यांकडे दुर्लक्ष करताना आढळतात. परिणामी या आधुनिक प्रेमवीरांचे धाडस दिवसागणिक वाढत चालले आहे. यामध्ये आपली मुले नाहीत, म्हणून आपण त्यांच्याकडे दुर्लक्ष करत असू, तर अन्य कुठेतरी आपली मुलेसुद्धा हेच करत नसतील याची शाश्वती आपण देऊ शकतो का ? आपण भारतात राहतो. येथील संस्कृती असल्या स्वैराचाराला मुळीच मान्यता देत नाही. त्यामुळे संस्कृतीला काळिमा फासणारे कृत्य रोखणे आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

**जगन घाणेकर**
**मो.९६६४५५९७८०**

# त्याग आणि बलीदाणाची मूर्ती म्हणजे माता रमाई-कॅप्टन राजाभाऊ आठवले



बीड, (प्रतिनिधी) :- त्यागमूर्ती माता रमाई यांची १२७ वी जंयती बलभीम नगर बुद्धविहार शिवाजीनगर बीड येथे साजरी करण्यात आली. याप्रसंगी मोठ्याप्रमाणात बौद्ध उपासक उपासिका उपस्थित होते, प्रथम आदर्शाची पुजा करुन कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली.आध्यक्ष म्हणून चंद्रामाय जाधव व फुलामाय इंगळे शोभाताई आठवले तर प्रमुख पाहुणे म्हणून आर. पी आय. चे प्रदशाध्यक्ष पप्पूजी कागदे साहेब,जेष्ठ नगर सेवक नर्सिंग नाईकवाडे, नगरसेवक विनोद मुळूक, जिल्हा प्रमुख सचिन मुळूक,निर्भीड जनपत्रकार सुनिलजी डोंगरेसर,अशोक शेजवळ, आसाराम औसरमाल साहेब, कॅप्टन राजाभाऊ आठवले, डी. जी वानखेडेबाबा,प्रशांतजी वासनिक, साहेबराव तरकासे,संजय मिसाळ, महेंद्र वडमारे, प्रमोद शिंदे, चेतन पवार, निखिल सवाई याची उपस्थित होती या कार्यक्रमात निशांत वडमारे या बालकाने माता रमाई यांचे जीवन चरित्र सांगून गीत गायले त्या बद्दल ॲड तेजस वडमारे व साहेबराव तारकसेसाहेबांनी त्यास प्रत्येकी २०० रुपये बक्षीस व जयंती उत्सव समिती कडून एक रमाई मातेचे पुस्तक भेट दिले त्यानंतर .कॅप्टन राजाभाऊ आठवले यानी माता रमाई यांच्या जीवनातील त्याग आणि बलिदाना बद्दल सांगुन त्यानी बाबासाहेबनां कशी खंबीर साथ आणि बाबासाहेब अमेरिकेत होते तेव्हा रमाबाईंनी खूप कठीण दिवस घालवले. रमाबाईंनी या कठीण काळातही कोणतीही तक्रार न करता मोठ्या संयमाने हसून दिवस काढले. डिसेंबर १९४० मध्ये बाबासाहेब डॉ. भीमराव आंबेडकर यांनी थॉट्स ऑफ पाकिस्तान हे पुस्तक लिहिले आणि ते केवळ त्यांची पत्नी रमाबाई रामू यांना समर्पित केले, हे सांगत असताना सर्वांचे डोळे भरून आले, त्यानंतर अंजली तेजस वडमारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. ❊सरनतय ने कार्यक्रम संपन्न : झाल्यानंतर दुपारी २ ते ५ पर्यंत भोजनदान करण्यात आले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ वडमारे, उपाध्यक्ष अक्षय जोगदंड, सचिव अजय जाधव, राज जाधव, आर्यन साळवे, नागेश साळवे, अनिल अंकुटे,राजू धनवे संजय धनवे, प्रेम जोगदंड, सुरज वडमारे, शशी गवळी, यश गवळी,नितीन भालेराव निशांत वाघमारे, सनी जाधव सिद्धार्थ साळवे विराज साळवे रितेश साळवे आर्यन खेमाडे यांनी मेहनत घेतली त्याना ड तेजस वडमारे, गौतम खेमाडे, नितीन वाघमारे,बाप्पू खेमाडे, सिद्धार्थ सोनवणे, दिलीप गवळी अंकुश जाधव, निवृत्ती वाघमारे, मंगेश वडमारे, विशाल वडमारे यांनी मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी अंजली वडमारे, सरिता खेमाडे, आशा धनवे, कोमल वाघमारे, सुशीला साळवे, राधा साळवे, हौसाबाई वाघमारे, हेमा वडमारे, उर्मिला वडमारे, सुधा वडमारे, क्रांती धनवे आशा भालेराव, वर्षा खेमाडे, साखराबाई वाघमारे,जयश्री वडमारे,अर्चना जाधव, पद्मिणीबाई वडमारे,शिवकन्या खेमाडे, प्रीती जाधव,रमाबाई सोनवणे,नंदा वडमारे,राणी साळवे शिला साळवे, मंदा वडमारे,किरण वडमारे,सांची वडमारे,हर्षदा साळवे नंदिनी साळवे, जानवी वाघमारे, सानिका जाधव, अदिती धनवे .व परिसरातील सर्व शिव फुले, शाहू आंबेडकर याच्या विचाराचे बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

दैनिक
छ.संभाजीनगर, बीड, जालना, नांदेड, परभणी, धाराशिव, लातूर
# मराठवाडा पत्र
सोमवार,दि. १० फेब्रुवारी २०२५ 

## शरिरावर घाव, तोंड कपड्याने बांधलेलं, बीडमध्ये मृतदेह सापडल्याने खळबळ

बीड, (प्रतिनिधी) :- मागच्या काही दिवसांपासून गुन्ह्यांच्या घटनामुळे चर्चेत आलेल्या बीडमध्ये मृतदेह सापडल्यामुळे खळबळ माजली आहे. बीडच्या मांजरसुंबा येथे राष्ट्रीय महामार्गालगत एक मृतदेह सापडला आहे. या मृतदेहाच्या शरिरावर जखमा आहेत, तसंच तोंडही बांधलेलं आहे. हत्या करून हा मृतदेह रस्त्यावर टाकून दिल्याचा संशय पोलिसांना आहे. बीड तालुक्यातील मांजरसुंबा परिसरात एका ट्रक चालकाचा मृतदेह आढळला आहे. धुळे–सोलापूर महामार्गालगत एका शेतात कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथील ▶▶पान २ वर

### राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा कार्यकारिणीच्या
## अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल

गेवराई,(प्रतिनिधी) आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली सालाबादाप्रमाणे यावर्षी राष्ट्रवादी शिवजन्मोत्सव सोहळा २०२५ चे थाटात आयोजन करण्यात येत असून या सोहळ्याची कार्यकारणी आ. विजयसिंह पंडित यांनी जाहीर केली असून कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल तर कार्याध्यक्षपदी संदिप मडके यांची निवड करण्यात आली आहे. सर्व पदाधिकारी व सदस्यांचे स्वागत आ. विजयसिंह पंडित यांनी केले आहे. नूतन कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्षपदी संदिप मडके, सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी अॅड मनोज



हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल, सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे आ. विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन अभिनंदन केले आहे.

## क्रांती खेडकर दारव्ह्याच्या नव्या गटशिक्षणाधिकारी

वडवणी, (प्रतिनिधी):-दारव्हा येथील रिक्त असलेल्या गटशिक्षणाधिकारी पदावर क्रांती खेडकर यांना बढती देण्यात आली आहे. क्रांती खेडकर गेल्या ७ जून २०२४ पासून दारव्हा पंचायत समितीतच शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. त्यांची चांगली कामे पाहुन वरीष्ठांनी आता त्यांच्याकडे जिल्हा परिषद शिक्षण विभागाने बीईओ म्हणून जबाबदारी दिली आहे. दारव्हा येथील विलास जाधव यांची दिग्रस पंचायत समितीत सहायक गटविकास अधिकारी म्हणून पदोन्नती झाली आहे. प्रशासकीय सोयीसाठी दारव्हा पदाचा कार्यभार गटशिक्षाधिकारी आजपर्यंत त्यांच्याकडेच होता. अखेर या रिक्त पदावर शिक्षण विभागाने क्रांती महादेवराव खेडकर यांना बढती दिली आहे.त्या बीड जिल्ह्यातील वडवणी येथील रहिवासी आहेत. वडवणी येथील नामांकित ड. महादेवराव खेडकर यांच्या कन्या आहेत. सर्व स्तरातून क्रांती खेडकर यांना शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



## सहकारातील अडचणींवर चिंतन गरजेचे
### रांगा लावून ठेवी मागने चुकीचे–अॅड.अजित देशमुख



माजलगाव, (प्रतिनिधी) सहकार चळवळ ही मानव विकासासाठी एकमेकांना सहकार्य करणारी चळवळ आहे. सुमारे दीडशे वर्षांपूर्वी सहकाराचा उगम झाला. यानंतर अनेक सहकारी संस्था आल्या. थेट ग्रामीण भागापर्यंत फक्त सहकाराची चळवळ रुजली. शेतकऱ्यांना दारात जाऊन कर्ज देणाऱ्या संस्था म्हणून सहकारी संस्थांकडे पाहिले गेले. मात्र आता सहकारातील अडचणींवर चिंतन होण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे सहकारी संस्थांनी देखील एकत्र येऊन चिंतन करण्याची गरज निर्माण झाल्याचे ज्येष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त अॅड. अजित देशमुख यांनी म्हटले. माजलगाव येथील एका कार्यक्रमात कार्यकर्त्यांसमोर सहकारी चळवळीवर बोलताना अॅड. देशमुख पुढे म्हणाले की, खऱ्या अर्थाने सहकारी संस्था या ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेच्या कणा समजल्या जातात. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन कर्ज वितरण करणाऱ्या संस्था म्हणून विशेष कार्यकारी सहकारी संस्थांना संबोधले जाते. त्याचप्रमाणे सर्व प्रकारच्या सहकारी पतसंस्था या शेतकऱ्यांसाठी वरदान ठरलेल्या आहेत. आता अनेक ठिकाणी थोडी चर्चा झाली की, संस्थांच्या पुढे ठेवीदारांच्या रांगा लागतात. काही ठिकाणी संस्थांचे चुकत असेल. मात्र अनेक चांगल्या संस्थांना देखील अडचणीत आणण्याचा प्रयत्न काही ठिकाणी जाणीवपूर्वक होत असल्याचे दिसते. कोणतीच संस्था अथवा थेट राष्ट्रीयकृत बँक देखील सर्वच ठेवीदार पैसे मागण्यासाठी एकत्र आले, तर पैसे देऊ शकत नाही, हे वास्तव आहे. याकडे देखील पाहिले पाहिजे. विना सहकार नही उद्धार, यासारखे ब्रीद वाक्य घेऊन साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका, सहकारी पतसंस्था, बहुराज्यिय पतसंस्था, त्याचप्रमाणे अनेक प्रकारच्या सहकारी संस्था अस्तित्वात आल्या. लोकशाही पद्धतीने कारभार करणाऱ्या आणि सभासदांची मालकी असणाऱ्या या संस्थांमध्ये सातत्याने कायदेशीर बंधने वाढविण्यात आली. यात जनतेचे योगदान देखील मोठे आहे, असेही ते म्हणाले. राष्ट्रीयकृत बँका ज्या ठिकाणी ▶▶पान २ वर

### शेतकरी, कामगार व इतर नागरिकांच्या पाल्यांसाठी
## १२ वी विज्ञानसाठी शिष्यवृत्ती योजना

बीड, (प्रतिनिधी)- इयत्ता ११ वीमध्ये शिकत असलेल्या व १२ वीत जाणार्या विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी 'ज्ञानयश'च्या वतीने शिष्यवृत्ती योजना जाहीर केली असून एक वर्षभर विद्यार्थ्यांना जेईई आणि नीटचे मार्गदर्शन केले जाणार आहे. बीड जिल्ह्यात गुणवत्ता आहे अनेक क्षेत्रात विद्यार्थी पुढे जात आहे. मार्गदर्शना अभावी अनेकांना संधी मिळत नाही, गुणवंत विद्यार्थी स्पर्धेत टिकले पाहिजेत व यशस्वी झाले पाहिजेत. डॉक्टर, इंजिनिअर, नर्सिंग व इतर क्षेत्रात करिअर करु इच्छिणार्या विद्यार्थ्यांसाठी १२ वी विज्ञान चे मार्गदर्शन वर्गासाठी शिष्यवृत्ती योजना डॉ.पंडीत तुपे यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आल्या आहेत. बीड जिल्ह्यातील शेतकरी, कामगार व इतर क्षेत्रातील नागरिकांच्या पाल्यांसाठी ही योजना आहे.यामध्ये गणित, भौतिकशास्त्र, जिवशास्त्र रसायनशास्त्रचे मार्गदर्शन, तज्ञ प्राध्यापका मार्फत केले जाणार आहे यामध्ये १०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तरी आपली नावे ज्ञानयश, कोकाटे हॉस्पीटलच्या शेजारी आदर्श नगर, बीड येथे नोंदवावीत अथवा ९८२२९९२८७५ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा असे आवाहन प्रा.पंडीत तुपे यांनी केले आहे.

### व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांच्या
## सुहास्यनगरीचे रेषा संदेश पुस्तकाचे आज प्रकाशन

बीड, (प्रतिनिधी ):-बीड येथील विश्वविक्रम विजेते व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांच्या पहिल्या सुहास्यनगरीचे रेषा संदेश या कॉफी टेबल पुस्तकाचे प्रकाशन येत्या सोमवार १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता बीड शहरातील जालना रोडवरील आर्ट गॅलरीत राज्य बालनाट्य परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.दीपाताई क्षीरसागर, बीडचे अप्पर पोलिस अधिक्षक सचिन पांडकर , जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, समाजसेवक प्रविण इंगळे, डॉ.अनिल बारकुल, डॉ.अविनाश देशपांडे, मनसेचे संभाजीनगर सरचिटणीस प्रशांत जोशी यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. बीडमध्ये सन २०१३ मध्ये स्त्री भृणहत्या विषयावर सलग २२ तास ६२७ फुट लांब पेपवर व्यंगचित्र पट्टी रेखाटुन विश्वविक्रम केला होता. याची नोंद गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकार्ड त्याच बरोबर लिमका बुक ऑफ रेकॉर्ड, इंडीया बुक ऑफ रेकॉर्ड, वेब वर्ल्ड रेकॉर्डने घेतली होती. २०२४ मध्ये पेपरवर ९ एम.एम. बाय १० एम.एम आकारात वेठ बिगारी या विषयावर जगातील सर्वात छोटे व्यंगचित्र त्यांनी तयार केले होते. त्यांची नोंद वेब वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली होती. आजपर्यंत रस्ता सुरक्षा, शिक्षणाचा जागर, महिला सन्मान, संविधान जागृती, आरोग्य ,योगा, शेतकरी, महिला सबलीकरण, शेतकरी आत्महत्या, बालदिन, मोबाईल अतीवापर, सायबर क्राईम या सारख्या महत्वाच्या विषयावर ४ हजार व्यंगचित्रे तयार केली आहेत. त्यांनी सुहास्यनगरीचे रेषा संदेश हे कॉफी टेबल पुस्तक संपादीत केले असुन विविध विषयावर जनजागृती व्हावी. विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी. मोबाईलपासुन ते दुर व्हावेत म्हणून या पुस्तकाची निर्मिती केली आहे. पुणे येथील वल्लारी प्रकाशन संस्थेने हे ६४ पानी रंगीत पुस्तक प्रकाशीत केले आहे. या पुस्तकाचे प्रकाशन येत्या सोमवार १० फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता बीड शहरातील जालना रोडवरील आर्ट गॅलरीत होणार आहे. अशी माहिती बीडचे व्यंगचित्रकार सुहास पालीमकर यांनी दिली असुन या प्रकाशन सोहळ्यास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थीत रहावे असे आवाहन करण्यात आले आहे.



## सार्वजनिक शिवजयंती उत्सव लिंबागणेश अध्यक्षपदी अशोक वाणी,उपाध्यक्षपदी महेश ढवळे

लिंबागणेश, (प्रतिनिधी):-बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील ग्रामपंचायत कार्यालयात दि. ८ फेब्रुवारी शनिवार रोजी सरपंच बालासाहेब जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व उपसरपंच बाळकृष्ण थोरात,सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, डॉ . गणेश ढवळे, विक्रांत वाणी, संतोष भोसले, सुरेश निर्मळ,बाळकृष्ण मुळे,शंकर वाणी, पप्पू आवसरे ग्रामपंचायत सदस्य दामोदर थोरात,अक्षय वाणी, अशोक जाधव, , समीर शेख, रमेश गायकवाड,यांच्या उपस्थितीत प्रतिवर्षी प्रमाणे सार्वजनिक शिवजयंती उत्सव



समिती २०२५ गठीत करण्यात आली यावेळी नवनिर्वाचित समितीमध्ये अध्यक्षपदी अशोक वाणी, उपाध्यक्ष महेश ढवळे, सचिव सौरभ जाधव, सहसचिव दिनेश जाधव, कोषाध्यक्ष अशोक जाधव, सल्लागारपदी तुकाराम गायकवाड,वसीम शेख यांची तर सदस्यपदी महावीर वाणी, अभिजित गायकवाड, महावीर जाधव,औदुंबर नाईकवाडे,अभय वनवे, नितीन जाधव, सुभाष वाणी,बाबु शिंदे, ओंकार तागड, विक्की भोसले,अक्षय येडे,अक्षय ढवळे, विजय आगवान,अमर आबदार, स्वप्निल वक्ते यांची निवड करण्यात आली.प्रास्ताविकात सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ यांनी मागील संपूर्ण वर्षभरात शिवजयंती उत्सव समितीकडुन झालेल्या कार्यक्रमांची संक्षिप्त स्वरूपात ▶▶पान २ वर



बीड : छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे महिला क्रिकेट सामन्यामध्ये बीड जिल्हा महिला वकील संघाच्या दोन संघ करुन सामना खेळण्यात आला.

## वाल्मिक कराड एकटा बड्या पोलीस अधिकाऱ्यांना रोखू शकत नाही
### आ.क्षीरसागरांनी पुणे कनेक्शनही खोदून काढलं?

बीड,(प्रतिनिधी):-संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या तपासातील काही गोष्टी संशयास्पद असल्याचे वक्तव्य बीड मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी केले. आरोपी विष्णू चाटे याचा मोबाईल फोन अद्याप पोलिसांना सापडलेला नाही. त्यामुळे लोकांमध्ये संशय वाढत आहे. जोपर्यंत सीडीआर तपासला जाणार नाही, तोपर्यंत यात आणखी गुन्हेगार आहेत, त्यांचा रोल समजू शकणार नाही, असे संदीप क्षीरसागर यांनी म्हटले. ते रविवारी बीडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी संदीप क्षीरसागर यांनी वाल्मिक कराड यांना राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांची मदत मिळत असल्याचा आरोप केला. वाल्मिक कराड एकटा पोलीस अधीक्षक (एसपी) दर्जाच्या अधिकाऱ्याला थांबवण्याचे काम करु शकत नाही. त्याला धनंजय मुंडे यांनी सहकार्य केले आहे. पुण्यातील रुग्णालयात वाल्मिक कराड याला कोणी दाखल केले होते, याचा तपास करा. पुण्यातून फरार झाल्यानंतर वाल्मिक कराड कुठे गेला? सीसीटीव्ही फुटेज आहे. त्या अनुषंगाने तपास करुन ज्यांनी वाल्मिक कराडला मदत केली त्यांना पण या गुन्ह्यात आरोपी केले पाहिजे, अशी मागणी संदीप क्षीरसागर यांनी केली. धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला पाहिजे. संतोष देशमुख हत्याप्रकरण फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवले पाहिजे. मी पहिल्या दिवसापासून एकच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगतो की, खंडणी आणि हत्या हा एकच आहे. संतोष देशमुख यांचा खून हा खंडणीमुळेच झालेला आहे. विष्णू चाटेच्या मोबाईल मध्ये नक्कीच कुणाचेतरी रेकॉर्ड आहेत. यावर नक्की कुणाचा वरदहस्त हे तपासला पाहिजे. मी यापूर्वी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना भेटून वेळोवेळी या प्रकरणात तपास करण्याची मागणी केली आहे, असे संदीप क्षीरसागर यांनी म्हटले.

## सोयाबीनचे दर वाढत नसल्या कारणाने शेतकरी चिंताग्रस्त

किल्ले धारुर, (प्रतिनिधी) :-धारूर तालुक्यातील शेतकऱ्यासाठी सोयाबीन हे मुख्य पीक असल्याने बहुतांश शेतकऱ्यांना सोयाबीन पिकावरच अवलंबून राहावे लागते. मात्र, सोयाबीन पिकाला लागणारा खर्च व सध्याच्या सोयाबीनला मिळणारा दर यामध्ये मोठा फरक असल्याने सोयाबीनच्या पडलेल्या दरामुळे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. जिल्ह्यात कित्येक वर्षापासून सोयाबीनचे पीक मोठ्या प्रमाणात घेतले जाते. मुख्य पीक म्हणून सोयाबीनला शेतकऱ्यांनी पसंती दिली असून धारुर तालुक्यातील ७० ते ८० टक्के क्षेत्रात सोयाबीनचा पेरा केला जातो. कमी दिवसात सोयाबीन पीक येत असल्याने शेतकरी वर्ग अन्य पिकांच्या तुलनेत सोयाबीनला जास्त प्राधान्य देतात. त्यामुळे दिवसेंदिवस सोयाबीनच्या पिकात वाढ होत असताना सोयाबीनचे दर मात्र घटलेलेच असून दरात वाढ होण्याऐवजी घट होत असल्याने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झाले आहेत. सोयाबीनसाठी केलेला खर्चही निघत नसून कित्येक शेतकऱ्यांच्या ▶▶पान २ वर